# धगधगते निखारे

विजय अष्टेकर



॥ श्री गजानन प्रसन्न ॥



## माझे मनोगत .......

श्री. डी. एस. कुलकर्णी यांनी त्यांच्या अत्यंत व्यस्त शेड्यूलमधून वेळ काढून कविता वाचल्या आणि प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार.

कविता रसग्रहण करणे ही एक कला आहे. हे प्रस्तावना लिहिणारे डॉ. चावरे यांच्याशी चर्चा केली. त्या निमित्ताने त्यांचेही आभार.

श्री. डी. एस. कुलकर्णी साहेबांनी म्टल्याप्रमाणे कविता केली जात नाही, ती उत्स्फूर्तपणे निर्माण होते. तिला स्थळ, काळ, वेळेचे बंधन नसते. ती सुचली की लिहून ठेवणे गरजेचे असते अन्यथा विसरुन जाऊ शकते. दोन्ही कविता संग्रहातील कविता जशा सुचल्या आणि जिथे असेल तिथे शक्य तशा लिहून काढल्या.

दुसरा कविता संग्रह छापताना समाधान आहे की लेखणात थोडीशी परिपक्वता आली आहे. या संग्रहातील सर्वच कविता एक विशिष्ठ हेतू डोळ्यासमोर ठेवून लिहिल्या. सर्वच विषय गंभीर स्वरुपाचे, विचार प्रवर्तक आणि अंतर्मुख करायला लावणारे आहेत. काही कविता अशा आहेत की ज्यात अनेक व्यक्तींचे स्वभाव विशेष एकत्रित शब्दांकित केले आहेत.

खरे तर पहिल्या कविता संग्रहात सुद्धा काही कविता विचार प्रवर्तक आहेत, जसे एक विचार, लाईफ, मृगजळ, एक क्षण, प्रतिक्षा, व्यथा, काही सांगायचे राहून गेले इ. एका वाचकाला मात्र त्या दिसल्याच नाहीत किंवा पाहिल्या नाहीत, असो.

पहिल्या कविता संग्रहात असा विचार मांडला होता की, काही विषय असे आहेत, ज्यांच्यावर विस्तारुन लिखाण करता येईल. आता प्रयत्न करुन बघता येईल.

हा कविता संग्रह गंभीर स्वरुपाच्या कवितांचाच करायचा असे ठरवले असल्याने हलक्या-फुलक्या कविता अंतर्भूत केल्या नाहीत अन्यथा ती एक विसंगती जाणवली असती.

अनेक वर्षे जे पाहिले, जे ऐकले, जे अनुभवले ते कवितांच्या माध्यमाद्वारे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.

या संग्रहाद्वारे मराठी, हिंदी, इंग्रजी असे सर्व मिळून लिखाणाचे शतक पूर्ण झाले.

सर्वच कवितांचे विषय ज्वलंत आणि दाहक असल्याने **“धगधगते निखारे“** हे शीर्षक योग्य वाटले.

पहिल्या कविता संग्रहाच्या तुलनेत हा संग्रह जाणीवपूर्वक छोटा केला कारण वाचकांना कंटाळा येता कामा नये आणि सगळ्याच कविता गंभीर असल्याने नकारात्मक दृष्टीकोन निर्माण होऊ नये.

पहिल्या कविता संग्रहास वाचकांनी संमिश्र प्रतिसाद दिला. ज्यांनी आवर्जून प्रतिक्रिया दिल्या त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

या संग्रहातील मला जास्त आवडलेली एक कविता "विदारक सत्य". जेवढी पुनः पुनः वाचली तेवढी ती अधिक परिणाम करत गेली.

दुसरी "आयुष्य एक". या कविता म्हटले तर खूप अर्थपूर्ण आहेत. टीकाच करायची झाली तर असला नकारात्मक विचार करायला सांगितलंय कोणी. सकारात्मक दृष्टीने पाहाल तर आयुष्य किती सुंदर आहे. "मस्त कलंदर" व्हा आणि बिनधास्त जगा!

तिसरी "सहज म्हणून" ही कविता जितकी सहज सुचली तितकी सहज मनाला भावली. कदाचित काही वाचकांना ती रुचणार नाही, परंतु माझ्यासाठी ते एक उत्स्फूर्त काव्य!

संमिश्र प्रतिसाद मिळाला हे एवढ्यासाठीच म्हटले कारण अलिकडे लोकांना पुस्तक हातात घेऊन वाचायला वेळ नसतो. त्यात कवितेचे तर दूरच. याच कविता WhatsApp वर पाठविल्या तर कदाचित वाचतील सुद्धा. मला असे वाटते की शाळेत आता निबंधाचा विषय असेल WhatsApp - शाप की वरदान! मी WhatsApp वापरत नाही, पण त्याचा उपयोग आहे. म्हणजे फायदे जास्त आहेत हे कबूल करतो. तोटे अलिकडे लोकांच्या बोलण्यातून जाणवायला लागलेत, असो.

काही व्यक्तींनी नेहमीच प्रोत्साहन दिले आणि कौतुक केले तसेच काही सूचनाही केल्या. काही व्यक्तींनी मात्र प्रतिक्रिया देण्याचे टाळले कदाचित त्यांना त्या रुचल्या नसाव्यात.

पहिला कविता संग्रह पूर्ण करायला तीन वर्षे लागली. दुसरा मात्र एक वर्षाच्या आत पूर्ण झाला. सरावाचा बहुतेक परिणाम असावा.

कविता लिहून आनंद असा मिळाला की, दोन्ही संग्रहात वेगवेगळे विषय सुचत गेले आणि त्यावर लिहिता आले. परिणामकारक किती हे वाचकच ठरवतील. आणखी एक गोष्ट ठळकपणे जाणवली, ती म्हणजे कले इतका आनंद दुसरी कोणतीच गोष्ट देऊ शकत नाही.

श्री. संतोष भन्साळी यांच्या नांवाचा उल्लेख आवर्जून करायचा आहे, कारण त्यांचे मोलाचे सहकार्य दोन्ही संग्रहांसाठी लाभले. कविता संग्रहाचे मुखपृष्ठ व विषयानुरुप प्रत्येक पानावरची प्रतिकृती हे सर्व त्यांचे कौशल्य.

-- २९ मे २०१६

## अष्टेकरांच्या 'अष्टपैलू' कविता

कविता ही एका अज्ञात प्रदेशातून येते असे म्हटले जाते. 'जो न देखे रवि, वह देखे कवी' असे म्हटले जाते. त्यामुळे समस्त कविवर्यांबद्दल माझ्या मनात अतिशय आदर आहे. आधुनिक वाल्मिकी गदिमांच्या कवितांनी मला कविता जगायला शिकविली. आणि त्याच परंपरेतील सारी कवी मंडळी ही माझ्या आवडीची आहेत. त्यामुळे कवी विजय अष्टेकर यांचा कविता संग्रह मी आवडीने वाचायला घेतला. खरं तर कोणत्याही काव्य संग्रहावर प्रस्तावना लिहीण्याइतपत साहित्यिक अधिकार माझ्याकडे आहे की नाही यावर साहित्य संमेलनात चर्चा घडणे शक्य आहे. पण एखाद्या मनुष्याला स्वयंपाक येत नसला तरी तो उत्तम खवैय्या असू शकतो..... या न्यायाने कवितांचे रसग्रहण करुन ही प्रस्तावना लिहित आहे.

अष्टेकरांच्या कविता या अष्टपैलू आहेत हे मी पहिल्यांदाच नमूद करु इच्छितो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचा 'ऑगस्ट क्रांती' हा पहिला कविता संग्रह. आपल्याकडे साधरणतः कविता म्हटले, की प्रेम कविता.... एवढंच डोळ्यासमोर येतं. परंतु अष्टेकरांनी आपली लेखणी अष्टपैलू फिरवून विविध विषयांवर कविता केल्या आहेत. या कवितांचं एक उत्तम वैशिष्ट्य म्हणजे या कविता प्रतिकात्मक आणि वर्णनात्मक आहेत. कविता संग्रहाने काव्याशी त्यांची खरी नाळ जुळली गेली आहे. अष्टेकरांच्यांच शब्दांत सांगायचं झालं तर

*आपुले नाते हे कधी न तुटणारे*<br>*हे ऋणानुबंध कधी न संपणारे*

याच नात्याचा नवा गोफ विणून अष्टेकरांनी ह्या दुस-या काव्यसंग्रहाची निर्मिती केली आहे. खरं तर त्यांच्या हातून ती घडली आहे असं म्हणणं योग्य ठरेल. कारण अष्टेकरांच्या कविता केवळ यमक जुळविलेल्या नाहीत तर त्या कवितांच्या ओळी कित्येक दिवस किंवा कित्येक महिने.... त्यांच्या डोक्यात पिंगा घालीत असतील. आणि वर्षा ऋतूत एखादी सर यावी तसे हे शब्द सरसर कागदावर उतरले असतील, याचा प्रत्यय त्यांच्या या नव्या कविता संग्रहातील कविता वाचताना येतो.

यातल्या काही कविता वाचताना... त्या आर. के. लक्ष्मणांच्या 'कॉमन मॅन' ची शब्द प्रतिमा आहेत की काय इतक्या वास्तववादी वाटतात. 'अपेक्षांचे ओझे' मध्ये 'सालं आयुष्य आहे की भुताटकी, एकावर एक मानगुटीवर बसलेली' असं अपेक्षांचं वर्णन आपल्यालाही चटकन पटतं. आणि याच अपेक्षांमधून वाट शोधत आपल्यातलाच एक 'मस्त कलंदर' ही त्यांच्या कवितेतून डोकावतांना दिसतो.

सहज सोप्या शब्दांत खूप मोठा आशय दडलेला दिसतो हे त्यांच्या कविता संग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. थांबायचे की नाही कळत नाही, कुठे थांबायचे हे कळत नाही किंवा एक होता बैल घाण्याला जुंपलेला किंवा दावणीला बांधलेला... अशा छोट्या छोट्या पण आशयघन रचनांनी हा काव्यसंग्रह आपल्या मनाची पकड घेतो.

या दुस-या कविता संग्रहातही अष्टेकरांनी विविध विषयांवर काव्यरचनांची निर्मिती केलेली आहे. अध्यात्मिक, सामाजिक, मानसिक अशा सर्व स्तरांवरच्या या कविता निश्चितच वाचनीय आहेत. अष्टेकर हे सनदी लेखापाल आहेत. या काव्यरचनांमध्याही त्यांनी शब्दांचा ताळेबंद खूप चपखलपणे मांडला आहे आणि रसिकांना तो नक्कीच आवडेल याची मला खात्री आहे.

— डी. एस. कुलकर्णी

# प्रस्तावना

“धगधगते निखारे” हा विजयजींचा दुसरा काव्यसंग्रह. या काव्यसंग्रहासाठी प्रस्तावना लिहिण्यासाठी त्या संग्रहातील हर एक कवितेचा अभ्यास करताना कवीच्या मनात, भावनिक व्यवहारात डोकावणे, मनोव्यापार समजून घेणे आवश्यक होते. हा प्रवास निश्चितपणे उद्बोधक होता.

कवीच्या मनोगतात व्यक्त झाल्याप्रमाणे या सर्वच कविता गांभीर्याने केलेल्या आहेत. त्यात व्यक्ती, समाज व स्वतःची निरीक्षणे व आठवणींचा समावेश आहे. शीर्षक - “धगधगते निखारे” वाचून काहीतरी ज्वलंत, स्फोटक विचार अनुभव आपल्यासमोर उलगडणार आहेत अशी अपेक्षा निर्माण होते. एकूण २९ कवितांचा हा संच आहे.

अनुक्रमणिकेवर नजर टाकतांना ‘विदारक सत्य’, ‘आक्रोश’, ‘शापित आपण’, ‘आसूड’, ‘खपली उडता’, ‘बर्फाचे चटके’, ‘चटक्यांचे डाग’, ‘हसते जख्म’ अशी शीर्षके वाचायला मिळतात. कविता संग्रहात साधारणपणे कवितांची शीर्षके इतकी थेट आढळत नाहीत. म्हणूनच या कविता संग्रहात थेट व्यक्त व्हायचे, अनुभवाला कोणताही आडपडदा न ठेवता भिडायचे असे कवीने मनात काहीसे सुनिश्चित करुन या कवितांची निवड केली असावी असे वाटते.

एखाद्या कवीची कलाकृती जेव्हा आपण वाचतो तेव्हा या कवीला काय भाष्य करायचे आहे ते आपण पहातो. हे भाष्य वयक्तिगत पातळीवरील आत्मचिंतन आहे का? त्याला वैयक्तिक अनुभवाची डूब आहे का? समाजातील काही घटना वा व्यक्ती या कलानिर्मितीचा विषय अथवा प्रेरणास्थान बनल्या आहेत का? या आत्मप्रगटीकरणातून काही वैचारिक बैठक समोर येत आहे का? कोणत्या भावनांचा अविष्कार या कलाकृतीतून घडतो? कवीच्या अनुभवातून, वाचनातून काही जीवनविषयक तत्वज्ञान आपल्याला शोधता येते का? अशा प्रकारचे प्रश्न मनात घेऊन आपण सर्वसामान्यतः कुठल्याही कलाकृतीचा आस्वाद घेत असतो.

या कविता संग्रहातील कविता ढोबळमानाने बघितल्या तर त्यांचे विषय हे वैयक्तिक नातेसंबंध, संस्कार व त्यांची सद्यस्थिती, आयुष्यावर केलेले मुक्त चिंतन, टीकात्मक विडंबन, आधुनिक जीवनपद्धती व त्यातील विसंगती, महाभारतातील अश्वत्थामा व कर्ण अशा व्यक्तिरेखा, चित्रपट व त्यातून मिळणारी प्रेमाची प्रतिके, व्यक्तीनिरीक्षणात्मक आत्मसंवाद, स्वानुभव, सामाजिक जाणिवा, प्रेम व नातेसंबंध व त्यांची उसवत जाणारी वीण इ. आढळतात. एकंदर पहाता हा खूप मोठा कॅन्व्हास आहे.

माणसाला न सुटणारी हाव, चटक तसेच समाजातील टोकाची दरी हे कवीच्या चिंतनाचे विषय आहेत. या सगळ्या गुंत्यातून न सुटणारे आयुष्याचे कोडे कवीला व्यथित करते. हे सारे बदलता येत नसल्याने येणारी विषण्णता, असहाय्यता, चडफडणे ही कवीची त्यावर मनस्वी प्रतिक्रिया आहे. ‘खदखदते आहे’, ‘तहानलेले पाणी’, ‘आसूड’ या कविता उदाहरणादाखल सांगता येतील.

कवीची नजर व जीवनविषयक जाणिवा तीव्रतेने सजग आहेत व त्यामुळे उसाचा गाडा

घेऊन फिरणा-या कुटुंबाची जीवनकथा कवीला कवितेचा विषय देऊन जाते. त्यानंतर 'जावे त्याच्या वंशा' ही कविता प्रतिकात्मक होत जाते.

न संपणारी तृष्णा, ईर्षा, अहंकार, असुरी अपेक्षा या सगळ्यांचा परिणाम स्वरुप आजचा आधुनिक मानव भटकत व भरकटत रहातो व कितीही धावला तरीही अंतर्बाह्य रितेपण हेच आयुष्याच्या शेवटी शिल्लक उरते ही खंत कवी "जीवनगाणे" व "मी प्रवासी" या कवितांमधून व्यक्त करताना दिसतो.

समाजपुरुषाचा होत असलेला असह्य कोंडमारा हा "मोकळा श्वास" या कवितेचा विषय आहे. या कवितेला सुसंबंद्ध फॉर्म नसल्यामुळे मांडणी थोडी विस्कळित वाटली तरी त्यामागचा विचार समजून घेता येतो. व्यक्तीगत जीवनातील हरविलेली "स्पेस", भावनांचा कोंडमारा व मार्गदर्शकाचा अभाव या गोष्टी कवितेत जाणवतात.

'खपली उडता' ही कविता वाचताना, कवीच्या मनात जुन्या जखमा अजूनही ताज्या असाव्यात असे वाटते. त्यावर खपलीही बसते पण जाणता अजाणता, प्रसंगोत्पात्त ती खपली उडते व आठवणींच्या रक्ताची धार भळभळू लागते. याचा अर्थ खपलीचे आच्छादन आहे पण त्या जखमा पूर्ण ब-या होत नाहीत. वारंवार आघात तरी खपली काढतात किंवा कवी मन स्मरणरंजनाच्या द्वारे ती खपली काढून ती जखम ताजी जिवंत ठेवत आहे असे वाटते. हा आत्मक्लेश कशासाठी असा प्रश्न पडतो.

'बर्फाचे चटके' ही कविता आयुष्यातील दोन कालखंडांवर प्रकाश टाकते. दोघांमध्ये निर्माण झालेले गहिरे प्रेमळ संबंध, आर्तता नंतर मात्र कटुता, टाळणारी नजर व खटकणारे संवाद या वेगळ्या वळणावर जातानाचा प्रवास या कवितेत मांडला आहे. तथापि हे असे का घडले यावर मात्र कवी कोणतेच भाष्य करीत नाही. कवितेच्या शीर्षकातून कविमनाला झालेल्या वेदना अधोरेखित होतात.

प्रत्येक कवीचा स्वतःशी संवाद होणे अपरिहार्य आहे. आपल्याच मनाची निर-निराळ्या परिस्थितीत व भावावस्थेत येणारी प्रतिक्रिया हा कविच्या कुतुहलाचा विषय आहे व या संवादातूनच कवी स्वतःला हळू हळू सापडत जातो. त्यातूनच जन्माला येते 'बा मना' ही कविता.

असा हा कवीबरोबर चालू झालेला प्रवास वाचकाला निराळी अनुभूती देत विचारप्रवण करीत, समृद्ध करीत जाईल असा विश्वास वाटतो. त्यासाठी कवीच्या अनुभवाबरोबर प्रवास करताना आपला अनुभव व आपल्या जीवनविषयक संकल्पना आपल्यासमोर येणे स्वाभाविक आहे व आवश्यकही. एका अर्थी कवी आपल्याला न जाणवलेल्या अथवा कमी तीव्रतेने जाणवलेल्या गोष्टी ठाशीव स्वरुपांत शब्दांच्या आधारे मांडतो व तो अनुभव अधिक रसपूर्णतेने समजून घ्यायला, आत्मसात करायला मदत करतो.

कवी बरोबरचा आपला हा प्रवास अधिकाधिक उद्बोधक होवो ही वाचकांना व कवीला मनापासून शुभेच्छा!

**डॉ. सदानंद चावरे, पुणे**

## अनुक्रमणिका


विदारक सत्य ........................................ १
अपेक्षांचे ओझे ........................................ २
जावे त्याच्या वंशा .................................. ३
आयुष्य एक ......................................... ४
मस्त कलंदर ........................................ ५
शाश्वत काय ........................................ ६
मी प्रवासी ............................................ ७
जीवन गाणे ......................................... ८
माझी कथा .......................................... ९
ताळेबंद मांडता ..................................... १०
अश्वत्थाम्याची व्यथा................................ ११
प्रेमा तुझा रंग कसा ................................ १२
आक्रोश .............................................. १३
शापित आपण ....................................... १४
मोकळा श्वास ....................................... १५
खदखदते आहे ..................................... १६
बा मना .............................................. १७
खपली उडता ....................................... १८
तहानलेले पाणी..................................... १९
एक आसूड .......................................... २०
गर्वाचे घर .......................................... २१
बर्फाचे चटके ....................................... २२
चटक्यांचे डाग ..................................... २३
उपेक्षित पाहुणा ..................................... २४
सहज म्हणून ........................................ २५
कोमेजलेला चाफा ................................. २६
हसते जख्म.......................................... २७
झणझणीत अंजन ................................... २८
एकाकी कर्ण......................................... २९

*अलीकडेच वाचनात आलेल्या एका*
*कवयित्रीच्या कवितांवरुन प्रेरित होऊन*

# विदारक सत्य...

एखादा सुंदर पलंगपोस
ओढून काढावा
अनेक कारणांनी पडलेले डाग
ठिकठिकाणी फाटलेल्या गादीतून
डोकावणारा आणि बाहेर येणारा कापूस
मनावरचे कातडे ओढून काढल्यावर
भरलेल्या जखमांचे व्रण
ओल्या जखमांतून भळभळणारे रक्त
त्याबरोबर उसळणा-या आठवणी
ते प्रसंग, ती माणसे
काळाच्या पडद्याआड झाकलेले
स्मृतीआड गेलेले
महानाट्यातले छोटे छोटे प्रवेश
काहीना नेपथ्य लाभलेले
चैत्रातल्या हळदी कुंकवा सारखे
आरास मांडून ठेवले
तटस्थपणे त्यांच्याकडे पाहत
मावळतीच्या सुर्याकडे
डोळे कधी लागले कळलेच नाही

# अपेक्षांचे ओझे

*जड झाल्यामुळे जाणीव झाली*

कुबड आलेल्या माणसाची शरीर कमान
अपेक्षांचे ओझे वाढतच आहे
सालं आयुष्य आहे की भुताटकी
एकावर एक मानगुटीवर बसलेली
ससा कासवाची शर्यत बरी
हरला तरी झोपेचे समाधान आहे
द्रौपदी वस्त्र हरणाच्या साड्या कदाचित संपतील
चरख्यात सापडलेल्या उसाचा केविलवाणा चेहरा
वेगवेगळे मुखवटे लावलेत घरी आणि दारी
नाटकातले प्रवेश संपतच नाहीत
मागणाऱ्यांची शृंखला अतूट आहे
समाधान आमच्या शब्दकोशातच नाही
धर्मस्थळांचे उंबरठे झिजवतो आहोत
नवस सायास व्रत वैकल्य तर रोजचेच आहे
वाघ मागे लागल्या सारखे पळतो आहोत
कारण बाळकडू! थांबला तो संपला
अपेक्षाभंगाचे दुःख पचवून
आम्ही निगरगट्ट झालो आहोत
अभिमानाने आम्ही सर्वांना सांगतो
वाकेन पण मोडणार नाही

*कोणी जिंकण्यासाठी धडपडते*
*तर कोणी जगण्यासाठी*
*उस रसाचा फिरता गाडा घेऊन*
*जाणा-या कुटुंबावरुन सुचली*

# जावे त्याच्या वंशा...

कळप घेऊन मेंढरांचे
फिरतो आम्ही धनगर
रानोमाळ आणि गावोगाव
आयुष्याला कायमचीच घरघर

आयुष्य आमचे हंगामी
जसा कारखाना उसाचा
हात पाय कापून येती
तोडून उस गावोगावचा

गारुडी, दरवेशी, पिंगळा, वासुदेव
सारेच खेळ डोंबाऱ्याचे
आज इथे तर उद्या तिथे
जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे

कधी अर्ध पोटी तर कधी उपाशी पोटी
भ्रांत आम्हा रोजच्या भाकरीची
कसले शिक्षण कसली करमणूक
खोटी आशा चांगल्या उद्याची

नेपोलियन काय सिकंदर काय
लढाई त्यांची जिंकण्याची
गणिका काय नि तृतीय पंथी काय
लढाई यांची जगण्याची

# आयुष्य एक

*तटस्थपणे एखाद्या घटनेकडे पहावे*
*तसे चष्मा बदलून स्वतःकडेच पहावे*

उचलावे आणि भिरकावून द्यावे
शक्य तेवढ्या दूर कधी न सापडण्यासाठी
अट्टाहासाने दिशाहीन भटकत रहावे शोध घ्येण्यासाठी
कुठे आहे आयुष्य ते तर कधीच निसटलय
मुठीतून वाळू निसटावी तसे
खोटा अभिमान बाळगून आहे मी
हे मिळवलं ते मिळवलं
मग मी विचार करु लागतो
काय घेऊन आलो मी काय घेऊन जाणार मी
आठवण सुध्दा बरोबर नेता येत नाही
कष्टाने शोधलेले आयुष्य
पुन्हा भिरकावून देतो न सापडण्यासाठी
व्यावहारिकता आणि भावनिकता
यांच्या द्वंद्वात सापडून रक्तबंबाळ होतो
लोचट मन चिवटपणाने पुन्हा उभारी घेते
पुन्हा शोध सुरु होतो
हा खेळ कधी संपणार कोण जाणे
कधी त्रयस्थ नजरेने स्वतःकडेच पहातो
आणि कीव येते त्या धडपडीची
वय वाढलंय शरीर वाढलंय
विचारांची वाढ कधी खुंटली
याची जाणीवच झाली नाही
स्वतःच्याच तंद्रीत मस्तीत जगतो आहे
ओ एम जी तल्या कानजी लालजी मेहताच्या ताविदा सारखे
भिरकावून द्यायचे आहे पुन्हा न सापडण्यासाठी



*अनेक महिने पहिली दोन*
*कडवी लिहून ठेवली होती*

# मस्त कलंदर...


उधळीत रंग मुक्त हस्ताने
चाललो मी दूर क्षितिजाकडे
मज नसे भान कशाचे
डोंगर द-या अथवा कडे

अथांग सागर आहे सोबतीला
न खंत न फिकिर जगण्याची
बंधमुक्त झालो आज मी
न भीती उरली मरणाची

काय ते जगणे काय ते मरणे
किडा मुंगी बरे म्हणावे
हिशोब मांडता सरते शेवटी
एक धुपाटणे हाती उरावे

बेहोष होऊन चालत रहावे
खुशाल चेंडू म्हणून घ्यावे
नको त्या चिंता नको त्या अपेक्षा
धुंद होऊन उपभोगावे

मस्त कलंदर आहे मी
नसे वावडे चाली रीतीचे
सुख दुःखाची तमा न उरली
आयुष्य माझे कवडी मोलाचे



# शाश्वत काय...

काय असते आपुल्या हाती
न जगणे न मरणे
संत महात्मे सांगून गेले
ठेविले अनंते तैसेची रहाणे


When we fail
Man proposes God disposes
When we win
It's all my achievement

एक बडे कवी हुवा करते थे
लोगोंसे हमेशा कहा करते थे
कोई चीज मुझें मिल जाये तो अच्छा
वो अगर न मिल जाये तो ज्यादा अच्छा

Life is a battle field
Whether you live or you die
Always you lose something
Better you make it a tie

सुख दुःख यश अपयश
टिकत तर काहीच नाही
कशाला हवी जिवाची तगमग
शाश्वत तर काहीच नाही

*आयुष्य हाच एक प्रवास आहे*
*पासपोर्टची मुदत प्रत्येकाची वेगळी आहे*
*व्हिसा सक्तीचा आहे*



# मी प्रवासी...

पळा पळा कोण पुढे पळे तो
प्रत्येकजण धावतो आहे
वाघ मागे लागल्या सारखा
८.३२ ची लोकल गाठायची आहे

एकदा प्रयत्न करुन वेग कमी केला
धापा टाकत थोडं थांबलो
कोणी गाजर दाखवत आहे
कोणी आसूड उगारला आहे

बाळकडू पाजलं आहे
थांबला तो संपला
घोडं घेतलं गाडी हवी
घर बांधलं माडी हवी

एक हौस जी भागली नाही
एक प्रेम जे मिळालं नाही
एक समाधान जे मिळवता आलं नाही
एक स्वप्न जे पूर्ण झालं नाही

कुठे थांबायचं उमजलं नाही
मागे वळून पाहिलं काहीच दिसलं नाही
देण्यासाठी हातात काही उरलंच नाही
आयुष्य कधी संपलं कळलं नाही

*गायचे तर सर्वांनीच*
*कोणी सुरात गातो कोणी बेसूर.*

थांबायचं की नाही कळत नाही
कुठे थांबायचं हे कळत नाही
थांबलो की प्रगती नाही
न थांबावे तर समाधान नाही

थकलो तरी उसंत नाही
अपेक्षांची शृंखला संपत नाही
गोव-या स्मशानात गेल्या तरी
हाव काही सुटत नाही

मी पुढे का तू पुढे
ईर्षा काही संपत नाही
अहंकार नसानसात भरलेला
सुंभ जळला तरी पीळ जात नाही

भटकणे संपत नाही
भरकटणे थांबत नाही
कितीही मिळालं तरी समाधान नाही
नाही मिळालं तर शांतता नाही

शरीर थकले तरी
मनाचा कोतेपणा जात नाही
इच्छा पूर्तीचा वर मिळाला तरी
पिंडाला कावळा काही शिवत नाही

*एक विडंबन*

# माझी कथा...



बेल बॉटम घातली
मांडीला दाटली
नको तिथे फाटली

कोल्हापुरी घातली
पायाला चावली
देवळात हरविली

सोन्याचं ब्रेसलेट घातलं
हौसेनं सर्वांना दाखवलं
चोरानं पळवलं


नवी गाडी घेतली
गुरु गुरु फिरविली
पुढच्या गाडीला धडकविली

मस्त पोरगी पाहिली
वाटलं हिला पटविली
तिने कानाखाली भडकविली

घरच्यांनी लग्न करुन दिलं
बायकोनं मोरु बनवलं
पोरांनी मामा बनवलं

करुन करुन भागलो अन्
देवपूजेला लागलो

# ताळेबंद मांडता...



जगण्याची लढाई
जिंकलो की हरलो
कागद पेन कॅल्क्युलेटर घेऊन
हिशेब मांडावयास बसलो

प्रेमाचे गणित
नेहमीच चुकत गेले
आकर्षणाच्या जुगाराचे दान
कधी सुलटे कधी उलटे पडले

तत्वनिष्ठ जगणे
कधी महागात पडले
भावनायुक्त संबंध
व्यवसायास नडले

आसक्ती आणि विरक्ती
नाण्याच्या दोन बाजू
दोन्ही बाजू सांभाळताना
हाती घ्यावा लागतो तराजू

हिशेब पूर्ण करुन झाले
नफा नुकसानीचे व्यवहार कळले
शेवटपर्यंत फरक काही सापडला नाही
त्यामुळे ताऴेबंद जुळला नाही

*असे म्हणतात अश्वत्थामा अजूनही कपाळावरच्या जखमेसाठी तेल मागत फिरतो आहे. जर त्याचे मागणे संपले नाही तर आपली काय कथा*

# अश्वत्थाम्याची व्यथा

महाभारत ते आधुनिक भारत
प्रवास काही संपत नाही
तेल मागणे थांबत नाही
दिवा काही विझत नाही

काय मागावे हेच कळत नाही
मागून मिळेलच याची खात्री नाही
मागणारे नेहमीच वंचित असतात
देणारे सतत अडचणीत असतात

पैसा अडका प्रेम प्रतिष्ठा
अधिकार सत्ता इच्छा मरण
मागून मरण सुध्दा मिळत नाही
कारण कायद्यात ते बसत नाही

बिचारा अश्वत्थामा त्याच्यापेक्षा भिकारी बरा
निदान स्टेटसचा प्रश्न नाही
अश्वत्थाम्याचे वंशज आम्ही
चालवत राहू वारसा आम्ही



खानदानाचे नाव रोशन करु
संपलो तरी मागत राहू
शपथ आम्हा अश्वस्थाम्याची
परंपरा आमची याचकाची

# प्रेमा तुझा रंग कसा...

*जसे पाणी, स्वतःचा रंग नाही.*
*हे माझे मत*

लैला मजनू हीर रांझा
आदर्श प्रेमाचे जणू मापदंड
उच्च कोटीतल्या प्रेमाचा गौरव
केला गेला देऊन देहदंड

मजनू आज बदनाम आहे
अपयशाचे ओझे वागवून
रांझा दारोदारी भटकतो आहे
दाढी वाढवून आणि कपडे फाडून

देवदास पारोची वेगळीच कथा
चंद्रमुखीच्या नशिबी निव्वळ व्यथा
एकतर्फी प्रेमाच्या अगणित रडकथा
आता तरी यातून सोडव रे नाथा

राधा कृष्ण प्रेमाची अनोखी अदा
कृष्ण कृत्याने विटाळलेली आजची राधा
सोयीप्रमाणे बदललेली प्रेमाची भाषा
प्रेमाचा अभाव आणि केवळ दिखाऊ तमाशा

प्रेम मागून मिळत नसते
हिसकावून ते घ्यायचे नसते
युद्धात येन केन प्रकारे जिंकायचे असते
प्रेमात मात्र सर्व प्रकारे हरायचे असते

*आपल्या अवती भवती असे अनेक दिसतात,*
*त्यांच्याकडे पाहून सुचली*

# आक्रोश

एक होता बैल
घाण्याला जुंपलेला
किंवा दावणीला बांधलेला

कधीही उठवावे
गाडीस जुंपावे
चाबकाने फटकारावे

वर्षातून एकदा येतो पोळा
नाईलाजाने सारे होती गोळा
श्वास घेता येतो मोकळा

बैलाने एकदा विचार केला
कष्ट उपसण्यासाठी जन्म आपुला
मानेवरचा जोखड फक्त सोबतीला
मरणाशिवाय सुटका नाही जीवाला

बैलाला कुठे भावना असतात
वेसणाने नाडया आवळलेल्या असतात
पाठीवर आसुडाचे वळ असतात
मनावर वळांचे ओरखडे असतात

दिवसरात्र राबायचे असते
मन मारुन जगायचे असते
मुग गिळून गप्प राहायचे असते

*सुचण्यामागे मानवी जीवनावर*
*अज्ञात शक्तीचे असलेले वर्चस्व प्रेरित होते*



# शापित आपण...

जीवन एक शाप की वरदान
कोण डॉक्टरकडे आहे याचे निदान
शाप घेऊनच आपण जन्माला येतो
उशापाचा पर्यायच कुठे असतो

असे म्हणतात कधी कोणाचे
शाप घेऊ नयेत
कधी घेतलेच तर
आठवणीने उशाप मागून घ्यावेत

शाप देणे त्यावर उशाप देणे
अशी आपली पौराणिक प्रथा
जिथे कृष्णाची सुटका नाही
तिथे तुमची आमची काय कथा

राम काय आणि शाम काय
सगळेच शापाने बाधित
वर मागून घेतले तरी
भोग कुणा चुकले नाहीत

शाप असो की वरदान
जगणे कुणा चुकले नाही
देव दानवांपेक्षा बरे आम्ही
वर शापांचे खेळ तरी नाहीत

# मोकळा श्वास...

*सीने में जलन आंखोमे तूफान सा क्यों है*
*इस शहर में हर शख्स परेशान सा क्यों है*

कोणी डॉक्टर सांगेल का
कसा घ्यायचा असतो ते
अहोरात्र गुदमरलेला
कधी मनाच्या कोंडमा-यामुळे
तर कधी भाऊगर्दीमुळे
सुमद्राकाठी आणि टेकड्यांवर
फिरतो आहे मोकळी जागा शोधत
प्रत्येकालाच हवा आहे डॉक्टर सहित
आता पटते लोकांना स्पेस का हवी ते
जन्म ते मृत्यु हा प्रवास
कोणाला गर्दीची बस मिळते
तर कोणाला मोकळी
गर्दीच्या बसमध्ये गुदमरतो
मोकळ्या बसमध्ये अडखळतो
कोणी हकीम, वैद्य, बुवा, महाराज सांगतील काय
कसा घ्यायचा असतो मोकळा श्वास
प्रत्येक श्वास भेसळयुक्त आहे
कधी रागाचा तर कधी दुःखाचा
कधी आनंदाचा तर
कधी वेदनेचा त्याला वास आहे
प्रत्येकाचा श्वास वेगळा आहे
काय चालले आहे?
या प्रश्नाचे समर्पक उत्तर
श्वसन चालू आहे
डॉक्टरचाच श्वास गुदमरलेला
तो पेशंटला काय ट्रीटमेंट देणार
मोकळा श्वास हे मृगजळ आहे
म्हटले तर जिवंतपणी सुध्दा मिळेल
अन्यथा मृत्युनंतरही भटकावे लागेल

असे म्हणतात जित्याची खोड
मेल्याशिवाय जात नाही
गोव-या स्मशानात गेल्या तरी
हाव काही सुटत नाही

अथक प्रयत्न केले तरी
गुंता काही सुटत नाही
ध्यान, धारणा, दीक्षा घेऊनही
आयुष्याचे कोडे काही उलगडत नाही

आधीच काही कळत नाही
कळले तर वळत नाही
गात्रे शिथिल झाली तरी
चटक काही जात नाही

सुटाबुटात राहून
कोणी पक्वान्न झोडतो आहे
पोटाची खळगी भरण्यासाठी
कोणी अनवाणी भटकत आहे

का होतो आहे मी हताश
कोण करते आहे मला निराश
असहायता मन विषण्ण करते आहे
चरफडण्याशिवाय हाती काय उरते आहे

*माझ्या मते आपल्या आयुष्यात सर्वात अवघड*
*काही असेल तर ते मनाचे चित्र रेखाटणे*

# बा मना

हे मना

उचंबळून येत आहे
स्वतःशीच कुढत आहे
सैरवैर धावत आहे
अधीर होत आहे

हे मना

तू का धीर धरत नाहीस
तू का उदास होत आहेस
तू काय विचार करत आहेस
तू का स्वतःला मारुन घेत आहेस

हे मना

तुझ्या खोलीचा थांग लागत नाही
तुझ्या अंतरंगाचा ठाव लागत नाही
तुला जाणून घेणे का जमत नाही
तुझ्यावर ताबा ठेवणे का जमत नाही

हे मना

तुझ्याकडे मोकळेपणाचे हसू आहे
तुझे अंतरंग मोकळे होत आहे
तुला गहिवरुन येत आहे
तू कृतार्थाने भरुन येत आहे

हे मना

तुझ्याशिवाय शरीर निचेष्ट आहे
तुझ्याविणा प्रेम अपुरे आहे
तुझ्याविणा भावना निरर्थक आहेत
तुझ्याशिवाय जीवन व्यर्थ आहे

*मनाची जखम कधीच सुकत नाही*
*खपली कधीही उडू शकते*

# खपली उडता

सुकलेली जखम ओली झाल्याने
चणचणना-या वेदनांची जाणीव
आठवणींच्या रक्ताची हळूवार लागलेली धार
शहारे उठल्यावर कंप पावणारी त्वचा
मन अस्वस्थ करुन सोडणारी विचारांची शृंखला
स्मृती आड गेलेले छोटे छोटे प्रवेश
अमानवी चेहरा असलेली पात्रे
एकामागून एक स्टेजवर अवतरतात
कोणी ओळखीचे कोणी अनोळखी
कोणी जवळचे कोणी लांबचे
सुन्न झाल्याने शून्यात नजर लागलेली
वादळात सापडलेल्या नौकेसारखे
मन भरकटू लागते
अथक प्रयत्नांनी ताळ्यावर येते
हळू हळू पुन्हा खपली धरु लागते
शब्दांचे तीक्ष्ण भाले चुकवत
जखम सांभाळावी लागते
खपली धरल्याने पुन्हा हायसे वाटू लागते
अधून मधून धक्का लागण्याची धाकधूक
निष्कर्ष खपल्यांनी खपलेले एक आयुष्य

*स्वातंत्र्याची साठी उलटली तरी*
*पाण्याची समस्या बाल्यावस्थेतच आहे*

# तहानलेले पाणी...



आडात नाही तर
पोह-यात कुठून येणार
पोटात नाही तर
डोळ्यात कुठून येणार

घडाभर पाण्याची
काय ती तहान
टँकरवाले सरकार
बनू पाहतेय महान

मिळत नाही कुणा पिण्यासाठी
उधळतोय कोणी गाड्या धुण्यासाठी
मस्तवाल आम्ही कोरड्या घोषणा करतोय
पाण्यावाचून कोणी तडफडून मरतोय

घडाभर पाण्यासाठी
कोणी तंगडतोड करतोय
पाण्याची बाटली नाही मिळाली
तर आमचा जीव जातोय

कुठे पाण्यासारखा पैसा वाहतोय
कोणी पैशासारखे पाणी साठवतोय
आमच्यासारखे बाकीचे करत काहीच नाही
तावातावाने बडबडून स्वतःचेच रक्त आटवतोय

# एक आसूड

*विषय सुचण्यामागे मैलोंमैल उस वाहून*
*नेणा-या बैलांचे दृश्य समोर होते*

उगारला की थरकाप उडतो
पडला की वळ उठतो
न वापरावा तर
डोक्यावर बसू पाहतो

कधी चामड्याचा असतो
कधी परिस्थितीचा असतो
एक माणसाच्या हातात असतो
दुसरा नियतीच्या हातात असतो

चामड्याचा स्वार्थासाठी उठतो तर
कधी वठणीवर आणण्यासाठी उठतो
परिस्थितीचा हिशेब चुकता करण्यासाठी उठतो
तर कधी अद्दल घडवण्यासाठी उठतो

बैल काय आणि माणूस काय
आसूड सगळ्यांच्याच राशीला
एकदा पडला की वळ उठतातच
कोणाच्या शरीराला तर कोणाच्या मनाला

आसूड एक माध्यम असते
राग काढायचे किंवा धडा शिकवायचे
खच्चीकरण तर नक्कीच आहे
कमी का जास्ती एवढेच पहायचे

*मोठ्या अभिमानाने जोपासला जाणारा*
*एक सामाजिक गुण*



# गर्वाचे घर

त्याला काय कळतंय
तो काय करणार आहे
असे छप्पन्न बघितलेत
माहित नाही मी कोण आहे

सुविचार आणि सुभाषिते
रोजच कानावर पडतात
इथे प्रत्येकजण जयकाल शिकरे
सिंघम बिचारे कायमच रडतात

शाळेत कधी वाचले होते
गर्वाचे घर नेहमीच खाली असते
खरे खोटे देव जाणे
इथे सगळेच हवेत असते

कोणीही उठावे आणि बोलावे
जड जाते पचवायला
माझ्याइतके कोणास कळते
अहंकार आमच्या पाचवीला पुजलेला

लोका सांगे ब्रह्मज्ञान
आपण कोरडे पाषाण
गर्वाचे घर खाली नाही.... वर
पटले तर घ्या नाही तर....



# बर्फाचे चटके

*आधी थंड ओलावा नंतर*
*तापलेला कोरडेपणा*

आपलेपणा दाखवणारे तुझे शब्द
मनाला हुरुप देऊन गेले
तू दिलेले चाफ्याचे फूल
आयुष्यात सुगंध पसरवून गेले

तुझ्या बोलक्या डोळ्यातील भाव
आशा पल्लवीत करुन गेले
माझ्या आवडी निवडी जपणा-या
तुझ्या धडपडीने मन भरुन आले

हुंदक्यांनी भरलेल्या तुझ्या बोलण्याने
माझे डोळे पाणावले गेले
आर्त स्वरातील तुझ्या हाकेने
हृदय हेलावून गेले

तुझी जळजळीत नजर
माझ्या डोळ्यात अंजन घालून गेली
तुझ्या बोलण्यातील कटुता
मनाला जखम करुन गेली

मला टाळण्यासाठी मिटलेले तुझे डोळे
खूप काही सांगून गेले
खटकणारे तुझे बोलणे आणि वागणे
तुझ्यापासून खूप दूर घेऊन गेले

*बर्फाचे चटके बसल्यावर*
*त्याचे डाग दिसणारच*

# चटक्यांचे डाग

नजरेचे विखारी बाण
आरपार निघून गेलेत
शब्दांचे तीक्ष्ण भाले
कातडी सोलवटून गेलेत

जखम कधी भरलीच नाही
खपली कधी धरलीच नाही
काही आठवणी मलम होऊन आल्या
तर काही चिघळवून गेल्या

आयुष्याची गोधडी
सगळीकडूनच उसवली आहे
पुनः शिवावी तर
दोरा तुटला आहे, सुई मोडली आहे

संजीवनी वनस्पती शोधण्यासाठी
सर्वदूर स्वार रवाना झालेत
जालीम उपाय योजण्यासाठी
रामबाण बनवायला घेतलेत

काही चटके
सहन करावेच लागतात
काही डाग
झाकून ठेवावेच लागतात

# उपेक्षित पाहुणा...

एक पाहुणा नको असलेला
विरोध करुनही घरात टपकतो
हाकलता येत नाही म्हणून
नाईलाजाने सांभाळावा लागतो

परिस्थितीने गांजलेला सर्वांनी नाकारलेला
खोट्या आशेवर जगत असतो
ग्रह बिघडलेले की नशीब रुसलेले
कोण जबाबदार या संभ्रमात असतो

उपाशी पाहुणा फिरतो दारोदारी
पैशाचा श्रीमंत पण प्रेमाचा भिकारी
भीक कोणी घातली नाही
पोट कधी भरले नाही

एक दिवस असा उगवतो
आमचा पाहुणा हरखून जातो
वाटले आता प्रतिक्षा संपली
जन्माची तपश्चर्या फळास आली

दिवास्वप्नातून अचानक जाग आली
अजूनही काळ रात्र संपली नव्हती
पाहुणा चारी मुंड्या चीत झाला
नियतीची सरशी झाली होती

*रात्री चालत फिरायला गेलो असताना*
*सहजच विषय सुचला*

# सहज म्हणून . . .

सहज म्हणून विचारले
सरपण गोळा करतोय
कधी बोलावणे येईल नेम नाही
आपण तयारीत असलेलं बरं

सहज म्हणून विचारले
कालची थोडी राहिलेली संपवतोय
बोलण्यासाठी कोणीतरी हवं आहे
म्हटलं घेऊन स्वतःशीच बोलावं

सहज म्हणून विचारले
लैला मजनूची कहाणी वाचतोय
यांचे लग्न झाले असते तर
मध्यम वर्गीय माणसाची सामान्य शंका

सहज म्हणून विचारले
देवाची पूजा करतोय
विचारे देवही कंटाळलेत आम्हाला
त्यानाही थोडा बदल हवा आहे

सहज म्हणून विचारले
सहजच इकडे आलो होतो
सहजासहजी इथून पाय निघत नाही
किती सहजतेने पाश आवळला गेला कळलेच नाही



# कोमेजलेला चाफा....

संधिकाली त्या तशा
भेट तुझी माझी स्मरते
प्रेमअंकुरा बीज रुजते
वठल्या मना नवपालवी फुटते

बंद ओठातील अनेक शब्द
बोलके डोळे सांगून गेले
आतुरलेल्या तुझ्या मनाने
माझे चित्त हिरावून नेले

अवसेच्या क्षितिजावर चांदणे पसरले
नवचैतन्याचा वसंत फुलला
स्वप्नांना नवे रंग लाभले
तुझे माझे सूर जुळले

कोणाची बर दृष्ट लागली
नशिवाने मग पाठ फिरविली
कोड्यासम तुझे वागणे
दुर्मिळ झाली भेट अपुली

वाट पाहून डोळे निवले
विचार करुन मन थकले
वयोपरत्वे शरीरही थकले
परतीच्या प्रवासाचे वेध लागले

अनवाणी पायाला उन्हाचे चटके
उपाशी पोटाला भुकेचे झटके
अंग झाकायला कपडे फाटके
सिग्नलला उडतात गि-हाईकाशी खटके

कुठे अर्धपोटी जगणे
कुठे ओबेसिटीचे दुखणे
कुठे खेळणी विकून पोट भरणे
कुठे कपाटे खचाखच भरुन वाहणे

काय ही असमानता
फुकाची का करितो आपण चिंता
तावातावाने चर्चेचे गु-हाळ चालवतो
गेला बाजार विसरुन जातो

घेणे फक्त आम्हाला माहिती
देण्याची परंपरा आमची नाही
वेळप्रसंगी लुबाडून घेऊ
उगाच काळजी करायची नाही

दानशूर कर्णाचा आम्हाला आहे अभिमान
गोष्टी वाचून आणि ऐकून वाटते छान
साठवून कुजवून फेकून देतो
गरजवंताचे अस्तित्वच आम्ही नाकारतो

# झणझणीत अंजन...

कोणी निंदा अथवा वंदा
फुशारक्या मारणे हा आपला धंदा
भूमिपुत्र झालेत कार्यकर्ते
आधीच आळशी आता नाकर्ते

अहंकार आमच्या पाचवीला पुजलेला
एक करायचे दहा सांगायचे
अर्ध्या हळकुंडाने पिवळे होतो
माझे तेच खरे म्हणायचे

पहिली पिढी खपते उभारण्यात
दुसरी पिढी मग्न उधळण्यात
तिसरी पिढी वावरते संभ्रमात
पुढची पिढी गुंडाळते बासनात

आम्ही फक्त गातो पोवाडे
कर्माचे असे आम्हा वावडे
ध्येय आमचे धन्याची चाकरी
भूक आमची केवळ भाजी भाकरी

पाहुणे आले आणि बळकावून बसले
त्यांनी राहत्या घराचे वासे मोजले
कर्म दरिद्री आम्ही पाहत राहिलो
आमच्याच घरात आम्ही उपरे झालो

# एकाकी कर्ण

व्यासांनी सांगितले गणेशानी लिहिले
एक महानाट्य धरतीवर अवतरले
असंख्य छोट्या छोट्या प्रसंगांनी नटलेले
कृष्ण कृत्यांनी भरलेले आणि भारलेले

महाभारतातील दानशूर कर्ण
आधुनिक भारतात याचकाचा जन्म घेतो
कौरव पांडवांचा जेष्ठ भ्राता
उपेक्षा आणि तिरस्काराचा धनी होतो

एक महाभारतातला दुसरा आधुनिक भारतातला
दोघेही अपमानित दोघेही उपेक्षित
दैवाच्या फटक्याने
एक उध्वस्त तर दुसरा पराजित

एकाने कवच कुंडले दान केली
तर दुस-याची आधीच काढून घेतली
एकास युध्दभूमीवर मरण आले
तर दुस-यास कर्मभूमीवर

दोघात साम्य तर खूपच आहे
फरक मात्र एकच असतो
जन्मापासून मृत्युपर्यंत एकाकी होते
कालचा स्मरणात आहे आजचा विस्मरणात जातो



मी ऑक्टोबर १९९४ पासून पुणे येथे सी. ए. म्हणून स्वतंत्र व्यवसाय करतो.

काही वाचकांची सार्थ शंका - कविता लिहिण्यास वेळ कसा मिळतो? खरे तर वेळ मिळत नसतो, काढावा लागतो. अर्थात व्यावसायिक कामांवर परिणाम करुन नक्कीच नाही. व्यवसाय ही टॉप प्रायोरिटी.

शाळेत असतांना चित्रे काढत होतो. आता ती कला शाबूत आहे की लुप्त झाली आहे हे तपासून पहावे लागेल.

गाडी चालविण्याची आवड आहे. जुनी गाणी विशेषतः लता मंगेशकर आणि इतर यांची गाणी बरोबर असतील तर कितीही लांबपर्यंत एकटा जाऊ शकतो.

गाण्यांची एवढी आवड आहे की उठल्यापासून झोपेपर्यंत गाणी नसतील तर श्वास देखील अडखळतो.

शांत आणि एकांतप्रिय स्वभाव असल्याने लोकसंग्रह कमी आहे.

व्यावसायिक लिखाणही काही प्रमाणात चालू आहे.

काही वाक्यरचना केल्या आहेत, जसे...

*अहंकार आणि स्वार्थ बाजूला ठेवला तर माणूस चमत्कार घडवू शकतो.*

*एकादी गोष्ट टाळता येत नसेल तर तिचा कंटाळा करु नये.*

**वाचकांना शतशः धन्यवाद!**

© विजय अष्टेकर
संदीप सोसायटी, सेवासदन स्कूल समोर,
एरंडवणे, पुणे-४११००४.

खाजगी वितरणार्थ